महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र. : तंशिविकापु/विवि/पदवी प्रवेश गुणवत्ता यादी तपासणी २०२०-२१/२०२२/9ee6    दिनांक : २९.०४.२०२२

**महत्वाचे परिपत्रक (गुणवत्ता यादी २०२०-२१)**
**कालमर्यादा - ०५.०५.२०२२**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सोबत जोडलेल्या यादीमधील
पदवी हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी,
पदव्युत्तर पदवी व्यवस्थापनशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र
अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांस इतर सामाईक परिक्षांद्वारे प्रवेशित विद्यार्थ्याच्या प्रवेश मान्यतेबाबत...**

**संदर्भ : मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र जा.क्र. तंशिप्र/१२२१/प्र.क्र.४४/प्रनिप्रा/११५५ दिनांक २७ एप्रिल, २०२२.**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संचालनायांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी संचालनालयामार्फत सादर करण्यात आलेले आहेत. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दि. ०३.०५.२०२१ च्या पत्राने सामाईक परिक्षा व्यतिरीक्त इतर सामाईक परिक्षांद्वारे प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत गुणांची प्रत्यक्ष पडताळणी करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्याअनुषंगाने, गठित करण्यात आलेल्या उपसमितीच्या अहवालानुसार काही विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध नसल्याचे आढळून आले.

सोबत जोडलेल्या इतर सामाईक परिक्षांद्वारे प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या यादीतील संबंधीत संस्थांनी सदर यादीनुसार आपल्या संस्थेमध्ये प्रवेशित विद्यार्थ्याचे **इतर सामाईक परिक्षांचे गुणपत्रक व परिक्षा प्रवेश पत्र** यांची संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेली प्रत (हार्ड कॉपी) या विभागीय कार्यालयास **रजिस्टर्ड पोस्ट / कुरियर अथवा हस्तदेय दिनांक ०६.०५.२०२२ पर्यंत** पोहचेल अशी सादर करावी तसेच त्याची एक प्रत प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांना सादर करावी.

**सदर कागदपत्रांची आवश्यकता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशाच्या संबधीत असल्याने, कागदपत्र सादर न केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास सर्वस्वी संस्थाप्रमुख जबाबदार राहतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

सोबतः वरीलप्रमाणे.

**(डॉ. द. व्यं. जाधव)**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : १) मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी (कार्यासन क्र. २अ)